शुक्रवार
२८
ऑगस्ट २०२६

वर्ष १९ वे
अंक - २०९
पाने - ०६
किंमत - ४ रूपये

- Web : www.yuvavarta.in/com
- Mail : dailyyuvavarta@gmail.com


# दैनिक युवावार्ता

परिवर्तनाचा पुरस्कर्ता


संपादिका : सौ. सुशीला किसन हासे (बी. ए.)
संस्थापक : किसन भाऊ हासे (बी. जे.)
कार्यकारी संपादक : सुदीप किसन हासे (एम.ई.)

- RNI No. MAHMAR/2007/24252

पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2023-25










दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

RNI No. MAHMAR/2007/24252

तिकीट न लावण्याचा
पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2023-25














## उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचे घारगावात स्वागत



युवावार्ता (प्रतिनिधी)

घारगाव - राज्याच्या उपमुख्यमंत्री सनेत्रा पवार लोणी येथे एका कार्यक्रमासाठी जात असताना नाशिक-पुणे महामार्गावरील घारगाव येथे त्यांचे ग्रामस्थांच्या वतीने जंगी स्वागत करण्यात आले. माजी जिल्हा परिषद सदस्य जनार्दन आहेर यांच्या पुढाकारातून झालेल्या या स्वागतावेळी ग्रामस्थांनी मोठा जल्लोष केला. महिलांनी औक्षण करून उपमुख्यमंत्री पवार यांचे स्वागत केले.

उपमुख्यमंत्रीपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर सुनेत्रा पवार यांचा संगमनेरमार्गे हा पहिलाच दौरा असल्याने राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांसह ग्रामस्थांमध्ये उत्साहाचे वातावरण होते. यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य जनार्दन आहेर यांनी घारगाव परिसरातील विविध विकासकामे व प्रलंबित प्रश्नांबाबतचे निवेदन उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना दिले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष कपिल पवार, सामाजिक कार्यकर्ते सुरेशराव आहेर, सरपंच नितिन आहेर, माजी जि. प. सदस्य ललित आहेर, दिलीप आहेर, रेषणा धात्रक, मनिषा आहेर, निलेश आहेर, अर्चना आहेर, अमृता कोळपकर, विविध संस्थांचे पदाधिकारी, अधिकारी आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

# शिवभोजन केंद्र चालकांवर उपासमारीची वेळ

## अनुदान रखडले; जिल्ह्यातील ३७ केंद्र चालक आर्थिक संकटात

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - गरिबांच्या भुकेचा आधार ठरलेल्या शिवभोजन योजनेतील केंद्र चालकांवरच आता उपासमारीची वेळ आली आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील ३७ शिवभोजन केंद्र चालकांचे गेल्या सहा महिन्यांपासून अनुदान रखडले असून, केंद्रांचा दैनंदिन खर्च भागविताना चालकांची आर्थिक कोंडी झाली आहे. शासनाने थकीत अनुदान तातडीने अदा करावे, अशी मागणी केंद्र चालकांकडून होत आहे.

महाविकास आघाडी सरकारच्या काळात तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या कार्यकाळात सुरू झालेली शिवभोजन योजना अल्प उत्पन्न गटातील नागरिकांसाठी मोठा आधार ठरली. शिवभोजन केंद्रांवर अवघ्या १० रुपयांत भात, वरण, पोळी आणि भाजी अशी थाळी दिली जाते. कामगार, रिक्षाचालक, मजूर, विद्यार्थी तसेच विविध शासकीय कामांसाठी शहरात येणाऱ्या नागरिकांना या योजनेचा मोठा लाभ मिळतो.

लाभार्थ्यांकडून १० रुपये घेतले जातात, तर उर्वरित रक्कम शासनाकडून अनुदानाच्या स्वरूपात दिली जाते. शहरी भागासाठी प्रतिथाळी ४० रुपये, तर ग्रामीण भागासाठी २५ रुपये अनुदान देण्यात येते. सुरुवातीच्या काळात केंद्र चालकांना नियमितपणे बिले




अदा होत असल्याने योजना सुरळीत सुरू होती. मात्र, गेल्या काही काळापासून अनुदान रखडण्याबरोबरच थाळ्यांची संख्या कमी करणे, केंद्र चालकांच्या अडचणींकडे दुर्लक्ष करणे आदी समस्यांना त्यांना सामोरे जावे लागत आहे.

कोरोना काळात शिवभोजन केंद्र चालकांनी कोणतेही बंधन न ठेवता स्थलांतरित कामगार, निराधार आणि गरजू नागरिकांना भोजन उपलब्ध करून दिले. त्या काळात नियमित अनुदान मिळत असल्याने केंद्र चालकांनी मोठी सामाजिक जबाबदारी पार पाडली. मात्र, आता त्याच केंद्र चालकांना शासनाकडून अनुदानासाठी प्रतीक्षा करावी लागत असल्याची खंत व्यक्त होत आहे. जिल्ह्यात सध्या ३७ शिवभोजन केंद्रे कार्यरत असून, शहरी भागातील १९ केंद्रांवर २३०० थाळी, तर ग्रामीण भागातील १८ केंद्रांवर १९५० थाळी मंजूर आहेत. अशा प्रकारे दररोज एकूण ४२५० थाळ्यांचा लाभ गरजूंना मिळत आहे.

गरिबांच्या ताटातील अन्नाचा आधार कायम ठेवायचा असेल, तर शासनाने शिवभोजन केंद्र चालकांचे थकीत अनुदान तातडीने वितरित करावे आणि योजना सुरळीत चालण्यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे.

# औषध निरीक्षक भरती प्रक्रिया रद्द, फेरपरीक्षा घेणार




मुंबई - पेपर फुटल्याचे लक्षात आल्याने महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत अन्न व औषध प्रशासन विभागातील औषध निरीक्षक, गट-ब या संवर्गासाठी घेण्यात आलेली भरती प्रक्रिया रद्द करण्याचा निर्णय आयोगाने घेतला आहे. २२ मार्च २०२६ रोजी झालेल्या चाळणी परीक्षेत गैरप्रकार झाल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर करण्यात आलेल्या प्राथमिक चौकशीच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला.

आयोगाने २९ जुलै २०२५ रोजी औषध निरीक्षक पदासाठी जाहिरात प्रसिद्ध केली होती. त्यानुसार २२ मार्च २०२६ रोजी राज्यातील सहा विभागीय मुख्यालयाच्या ठिकाणी ऑफलाइन पद्धतीने चाळणी परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेचा निकाल १२ जून २०२६ रोजी जाहीर करण्यात आला होता. चाळणी परीक्षेनंतर ५०६ उमेदवार मुलाखतीसाठी पात्र ठरले. त्यापैकी ४८८ उमेदवारांच्या मुलाखती १ ते २२ जुलै २०२६ या कालावधीत घेण्यात आल्या. २२ जुलै रोजी मुलाखती पूर्ण झाल्यानंतर औषध निरीक्षक पदासाठी पात्र ठरलेल्या ४८५ आणि अपात्र ठरलेल्या तीन, अशा एकूण ४८८ उमेदवारांची तात्पुरती सर्वसाधारण गुणवत्ता यादी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली होती.

दरम्यान, २२ मार्च रोजी झालेल्या चाळणी परीक्षेत गैरप्रकार झाल्याबाबत २२ ते २६ जुलैदरम्यान आयोगाला काही उमेदवार तसेच लोकप्रतिनिधींकडून ई-मेलद्वारे तक्रारी प्राप्त झाल्या. परीक्षा सुरू होण्यापूर्वी, २० मार्च रोजी काही उमेदवारांना प्रश्नपत्रिका अथवा प्रश्न मिळाले होते आणि ते सोशल मीडिया किंवा इलेक्ट्रॉनिक माध्यमातून प्रसारित करण्यात आल्याचा दावा तक्रारींमध्ये करण्यात आला होता. या तक्रारींचे गांभीर्य आणि प्रकरणाची संवेदनशीलता लक्षात घेऊन आयोगाने २७ जुलै रोजी मुंबई पोलीस आयुक्तांकडे चौकशीसाठी तक्रार दाखल केली. त्यानंतर गुन्हे अन्वेषण शाखेने प्राथमिक चौकशी करून आयोगाला अहवाल सादर केला. या अहवालानुसार, एका उमेदवाराला प्रश्नसंच मिळाल्याचे आणि त्याचा लाभ झाल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत असल्याचा निष्कर्ष नोंदविण्यात आला आहे.

### एक ब्रेकअप आणि झाला भांडाफोड

**मालेगाव येथील फार्मा कंपनीत नोकरी करीत असलेला गौरव आणि ऋतुजा पाटील यांच्यात प्रेमसंबंध होते. त्याने परीक्षेच्या दोन दिवस आधी ऋतुजाला प्रश्नपत्रिका दिली. विशेष म्हणजे गौरवचा भाऊ या परीक्षेला बसला होता. मात्र, त्याने भावाला प्रश्नपत्रिका न पुरविता प्रेयसीला दिली. परीक्षेनंतर गौरव व ऋतुजामध्ये वाद होऊन तिने लग्नाला नकार दिला. ब्रेकअपमुळे चिडलेल्या गौरवने ती अधिकारी होईल, या रागाने एमपीएससीला ई-मेल करून पेपरफुटीची तक्रार नोंदवली. मात्र, नंतर अटकेच्या भीतीने, २६ जुलै रोजी आणखी एक मेल पाठवून, 'मित्र नापास झाल्यामुळे मस्करी केली,' असे स्पष्ट करीत तक्रार मागे घेतली. यातूनच या पेपरफुटीचा पर्दाफाश झाला.**

# शॉर्टसर्किटमुळे सहा एकर ऊस जळून खाक, तीन शेतकऱ्यांचे मोठे नुकसान

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले- महावितरणच्या विद्युत तारांमध्ये झालेल्या शॉर्टसर्किटमुळे उंचखडक बुद्रुक येथे तीन शेतकऱ्यांच्या शेतातील सुमारे सहा एकर उभा ऊस आगीत जळून खाक झाला. बुधवारी (दि. २६) सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास घडलेल्या या घटनेमुळे शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले असून, हातातोंडाशी आलेले पीक डोळयांदेखत जळताना पाहण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली.

उंचखडक बुद्रुक परिसरात मोठ्या प्रमाणात ऊसशेती आहे. शेतांमध्ये छोटे बांध आणि अरुंद रस्ते असल्याने आगीवर नियंत्रण मिळविताना मोठी अडचण निर्माण झाली. त्यातच वाऱ्याचा वेग अधिक असल्याने आगीने काही क्षणांतच रौद्ररूप धारण केले. गावातील तरुणांनी धाव घेत शर्थीचे प्रयत्न केल्याने आग आटोक्यात आणण्यात यश आले; मात्र तोपर्यंत मोठ्या प्रमाणात ऊस जळून खाक झाला.

या आगीत अगस्ती सहकारी साखर कारखान्याचे माजी संचालक भाऊसाहेब खरात यांचा तीन एकर, रामनाथ पाचपुते यांचा दोन एकर आणि जगन्नाथ देशमुख यांचा एक एकर ऊस जळाला आहे. वर्षभर मेहनत, खर्च आणि कष्ट करून वाढविलेल्या उसाचे पीक क्षणार्धात नष्ट झाल्याने या शेतकऱ्यांवर मोठे आर्थिक संकट कोसळले आहे. आधीच शेतीमालाला अपेक्षित दर मिळत नसताना वाढता उत्पादन खर्च, नैसर्गिक संकटे आणि विविध अडचणींमुळे शेतकरी आर्थिक अडचणीत आहेत. त्यातच उभ्या उसाला आग लागल्याने संबंधित शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. महावितरणच्या विद्युत तारांमधील बिघाडामुळे ही आग लागल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला असून, प्रशासनाने तातडीने घटनास्थळी पाहणी करून नुकसानीचा पंचनामा करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासनाकडून तातडीने आर्थिक मदत व योग्य भरपाई मिळावी, अशी अपेक्षा शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. तसेच महावितरणने विद्युत तारांची व यंत्रणेची तातडीने तपासणी करून भविष्यात अशा दुर्घटना टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.













शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूधजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

We treat He cure's
धन्वंतरी
मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत
डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची
जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



# धर्माची ग्लानी सर्वप्रथम माणसाच्या अंतःकरणात होते - डॉ. संजय मालपाणी

## नृत्यवंदनेने भक्तिमय विचारसोहळ्याचा समारोप




संगमनेर- कर्म करताना ज्ञानाचा प्रकाश आणि कर्तेपणाच्या अहंकारापासून मुक्ती असेल, तर कर्माचे रूप साधनेत होते. कर्माचे डोळे ज्ञान असून अहंकाराचा त्याग हाच खरा संन्यास आहे, असे प्रतिपादन गीता विशारद, उद्योजक व शिक्षणतज्ज्ञ डॉ. संजय मालपाणी यांनी केले.

राजस्थान युवक मंडळाच्या चार दिवसीय 'मनशांती आणि जीवनविकास व्याख्यानमाले'च्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. यंदा डॉ. मालपाणी यांनी ज्ञानेश्वरीच्या तिसऱ्या व चौथ्या अध्यायाचा भावार्थ उलगडत 'कर्मयोग' आणि 'ज्ञान-कर्म-संन्यासयोग' यांचे विवेचन केले.

संन्यास म्हणजे संसार किंवा कर्तव्य सोडणे नव्हे, तर आसक्ती, अहंकार आणि कर्मफळाची गुलामी सोडणे होय, असे त्यांनी स्पष्ट केले. आपण फायनान्शियल बॅलन्स शीट मांडतो; पण लाइफ बॅलन्स शीट कधी मांडतो का? असा प्रश्न उपस्थित करत त्यांनी श्रोत्यांना आत्मपरीक्षण करण्याचे आवाहन केले. पैसा आणि साधने वाढली असली तरी समाधान, संबंध आणि मनाची श्रीमंती वाढली आहे का, याचा विचार करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

'यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत' या श्लोकाचा आधुनिक जीवनाशी संबंध जोडताना आळस, अहंकार, लोभ, तुलना आणि असंतोष ही अंतर्मनातील अधर्माची रूपे असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच प्रत्येक व्यक्तीची क्षमता वेगळी असल्याने मुलांची तुलना न करता त्यांच्या गुणांचा व आवडीचा विचार करावा, असा संदेश दिला.

कर्माच्या फळाशी स्वतःला बांधून घेणे हे दुःखाचे मूळ असून परिस्थितीपेक्षा तिच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन महत्त्वाचा आहे, असेही त्यांनी सांगितले. गीता रणांगण सोडून शांतता शोधायला शिकवत नाही; रणांगणात राहून मन शांत कसे ठेवायचे, हे शिकवते, हा संदेश त्यांच्या व्याख्यानाचा सार ठरला.

समारोपप्रसंगी राजस्थान युवक मंडळाचे अध्यक्ष मनीष मालपाणी यांनी डॉ. संजय मालपाणी यांच्या निरूपणाचे कौतुक केले. यावेळी वारकरी संप्रदायाचे भोयी रामकृष्ण महाराज करपे यांच्या हस्ते डॉ. मालपाणी यांचा सन्मान करण्यात आला. कार्याध्यक्ष सागर मणियार, कृष्णा आसावा, सम्राट भंडारी व कल्पेश मर्दा यांनी वाद्यवृंदाचा सन्मान केला. ओम इंदाणी यांनी सूत्रसंचालन व आभार मानले.

# संगमनेरमध्ये ईद-ए-मिलादुन्नबीचा जल्लोष

## भव्य मिरवणुकीतून दिला शांततेचा संदेश



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - प्रेषित हजरत मोहम्मद पैगंबर यांच्या जन्मदिनानिमित्त साजरा करण्यात येणारा ईद-ए-मिलादुन्नबी ईद मिलाद) उत्सव संगमनेर शहरात बुधवारी मोठ्या उत्साहात आणि धार्मिक वातावरणात साजरा करण्यात आला. मानवता, बंधुभाव, सत्य, प्रामाणिकपणा, दया, करुणा आणि शांततेचा संदेश देणारा हा पवित्र दिवस विविध धार्मिक कार्यक्रमांनी आणि भव्य मिरवणुकीने साजरा करण्यात आला.

प्रेषित हजरत मोहम्मद पैगंबर यांचा जन्म आणि मृत्यूचा दिवस एकच असल्याने जगभरातील मुस्लिम बांधव या दिवशी त्यांच्या शिकवणीचे करून स्मरण मानवतेच्या संदेशाचा प्रसार करतात. यानिमित्ताने शहरातील विविध मशिदींमध्ये कुराण पठण, विशेष नमाज, धार्मिक व्याख्याने तसेच

पैगंबरांच्या स्तुतीपर 'नात' गायनाचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले. (गरजू आणि गरीब नागरिकांना मदत, अन्नदान तसेच सामाजिक सलोखा वाढविण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात आले. काही धार्मिक संस्थांनी स्वच्छता मोहीम व रक्तदान शिबिरांचेही आयोजन केले होते. उत्सवानिमित्त प्रमुख रस्त्यांवर रंगीबेरंगी विद्युत रोषणाई करण्यात आली होती. सय्यदबाबा चौकात धार्मिक व सामाजिक संदेश देणारे देखावे उभारण्यात आले होते.

या निमित्ताने बुधवारी दुपारी २ वाजेच्या सुमारास नाईकवाडपुरा येथील जामा मस्जिदसमोरून भव्य मिरवणुकीस प्रारंभ झाला. लखमीपुरा कॉर्नर, देवी गल्ली, मोगलपुरा, सय्यदबाबा चौक, गवंडीपुरा, नवघर गल्ली, मोमिनपुरा, पोलीस

ठाणे, नगरपालिका, रंगार गल्ली, बाजारपेठ, गांधी चौक आणि तेली खुंट मार्गे ही मिरवणूक शहरातून मार्गक्रमण करत सायंकाळी पाच वाजता पुन्हा जामा मस्जिद येथे परतली. सय्यद बाबा चौकात मिरवणुकीचे व शहर काजी रकीब व मौलानांचे पुष्पवृष्टी करून स्वागत करण्यात आले. यावेळी सामाजिक कार्यकर्ते किशोर कालडा, शौकत फकीर महंमद शेख, शेख जबीरजानी तसेच पत्रकार सलीम शेख उपस्थित होते. मिरवणुकीदरम्यान शांतता आणि सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. कुणाल सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक समीर बारवकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

# पावसाळ्यातही पाणी टंचाई कायम; ९ हजार ग्रामस्थ टँकरच्या पाण्यावर

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर : पावसाळ्याचे दिवस संपत आले असतानाही संगमनेर तालुक्यातील पाणीटंचाईचे संकट अद्याप कायम आहे. तालुक्यातील सात गावे, तीन गावठाणे आणि १५ वाड्या-वस्त्यांमधील तब्बल ८ हजार ८४५ ग्रामस्थांची तहान सध्या पाच टँकरद्वारे भागविली जात आहे. त्यामुळे पावसाळ्यातही अनेक गावांना टँकरच्या पाण्यावर अवलंबून राहण्याची वेळ आल्याने पाणीटंचाईची तीव्रता अधोरेखित झाली आहे.

यंदा तालुक्यात अपेक्षित प्रमाणात पाऊस झालेला नाही. काही भागांत अधूनमधून झालेल्या पावसामुळे बंधारे, पाझर तलाव आणि सिमेंट बंधाऱ्यांमध्ये काही प्रमाणात पाणीसाठा झाला असला, तरी बहुतांश जलस्रोत अद्याप पूर्ण क्षमतेने भरलेले नाहीत. त्यातच गेल्या काही दिवसांपासून पावसाने उघडीप दिल्याने कडक उन्हाचा पाणीसाठ्यांवर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

सद्यस्थितीत पंचायत समितीच्या माध्यमातून पाणीटंचाईग्रस्त भागात पाच टँकरद्वारे नियमित पाणीपुरवठा सुरू आहे. मात्र, आगामी काळातही पावसाने पाठ फिरविल्यास टंचाईग्रस्त गावांची संख्या वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. परिणामी, आणखी वाड्या-वस्त्यांना टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याची वेळ प्रशासनावर येऊ शकते.

दरम्यान, तालुक्यात काही ठिकाणी झालेल्या रिमझिम पावसामुळे शेतशिवार, डोंगररांगा आणि परिसर हिरवागार झाला असून पिकांची वाढही समाधानकारक दिसत आहे. मात्र, पिकांसह जलसाठ्यांसाठी आवश्यक असलेला दमदार पाऊस अद्याप झालेला नाही. अनेक ओढे-नाले अद्याप पूर्ण क्षमतेने प्रवाहित झालेले नसल्याने शेतकरी आणि ग्रामस्थांचे लक्ष आभाळाकडे लागले आहे.

पावसाळ्याचे दिवस उलटत असतानाही हजारो ग्रामस्थांची तहान टँकरच्या पाण्यावर भागत असल्याने आगामी काळातील पाणीस्थितीबाबत चिंता वाढली आहे. दमदार पाऊस होऊन जलसाठे भरावेत, ओढे-नाले प्रवाहित व्हावेत आणि टँकरवरील अवलंबित्व कायमचे संपावे, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

SHRI BALESHWAR SHAIKSHANIK VA KRUSHI VIKAS FOUNDATION'S
SHRI SWAMI SAMATH INSTITUTE OF MANAGEMENT AND TECHNOLOGY
At-Malwadi, Post-Bota, Tal-Sangamner, Dist-Ahmednagar, Pin Code-422602
Email: shrisamarthiomt@gmail.com
(Approved by AICTE / DTE & Government of Maharashtra & Savitribai Phule Pune University)
ADMISSION NOTICE (NON-CAP)

| Sr. No. | Program | Choice Code | First Year Intake | Admission Type | Application Duration |
|---|---|---|---|---|---|
| 1 | MBA | 5509 | 180 | Against Vacant Seats after CAP Round | 03/08/2026 to 07/09/2026 |
| 2 | MCA | 5509 | 180 | | 03/08/2026 to 07/09/2027 |
| 3 | BBA | 5509 | 60 | | 09-08-2026 to 08-09-2026 |
| 4 | B.TECH | 5509 | 360 | | 03/08/2026 to 07/09/2026 |
| 5 | B.TECH LATERAL | 5509 | 240 | | 04/08/2026 to 07/09/2026 |

Applications are invited from eligible candidates for admission to First Year and Lateral Entry of above mention courses against vacant seats remaining after CAP rounds and/or Institute Level Seats, subject to availability and applicable admission rules for the academic year 2026-27.
Interested candidates should contact the Institute Admission Cell for eligibility, seat availability, application procedure and admission schedule.
Contact No.: 7588094642 / 7588094643

# नाशिकमध्ये शुक्रवारपासून कुंभ भक्ती संगम, मुख्यमंत्री करणार उद्घाटन

युवावार्ता (प्रतिनिधी)

नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणातर्फे आयोजित तीन दिवसीय 'कुंभ भक्ती संगम'ची तयारी पूर्ण झाली असून, २८ ते ३० ऑगस्टदरम्यान ठक्कर डोम येथे भक्ती, संगीत आणि भारतीय सांस्कृतिक परंपरांचा अनोखा संगम अनुभवता येणार आहे. महोत्सवाचे उद्घाटन २८ ऑगस्ट रोजी दुपारी साडेचार वाजता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार आहे. प्रवेश विनामूल्य असून तिकीट अथवा प्रवेशिका आवश्यक नाही. नाशिककर भाविक, विद्यार्थी व सांस्कृतिक रसिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंह यांनी पत्रकार परिषदेत केले.उद्घाटनानंतर सायंकाळी ५.३० ते ७ या वेळेत अमृताश्रम स्वामी महाराज यांचे कीर्तन, तर रात्री ८ ते १० या वेळेत राहुल देशपांडे यांचा 'अभंगवारी' कार्यक्रम होईल.२९ ऑगस्ट रोजी सकाळी १० ते १२ आणि दुपारी २ ते ४ या वेळेत 'भक्ती संमेलन' होणार आहे. भारतीय संत आणि समरसता' या विषयावरील पहिल्या सत्राचे समन्वयक पराग महाराज चातुर्मासे असून, शिवाजी महाराज मोरे, डॉ. वीरुपाक्ष शिवाचार्य महास्वामी, महंत श्रीमानस शास्त्री, सुदर्शन महाराज कपाटे, सुप्रिया साठे आणि प्रमोद महाराज जगताप सहभागी होतील.

# श्रीक्षेत्र साकूरच्या विठ्ठल-बिरदेव देवस्थानचा इतिहास

श्रीक्षेत्र साकूर येथील विठ्ठल-बिरदेव देवस्थानचा इतिहास पाहिला असता या देवस्थानाचा इंदूरच्या होळकर घराण्याशी असलेला निकटचा संबंध स्पष्ट होतो. होळकर घराण्याचे सुभेदार श्रीमंत मल्हारराव होळकर यांची राजधानी इंदूर येथे होती. महाराष्ट्रातील होळ येथील धनगर कुटुंबातून पुढे आलेल्या या घराण्याचा राज्यकारभार मध्य प्रदेशासह महाराष्ट्रातील पारनेर व आळेखिंड परगण्यापर्यंत विस्तारला होता. याच घराण्यात पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्यासारख्या कर्तृत्ववान महाराणी होऊन गेल्या.

**बिरोबाच्या भक्तीची होळकरांशी नाळ -**

श्रीमंत तुकोजीराव होळकर (दुसरे) यांच्या काळात दादा शिवराम खिल्लारी हे साकूर येथील बिरोबा देवस्थानचे पुजारी होते. तुकोजीरावांना तीन राण्या असूनही अपत्य नव्हते. याच काळात साकूर येथील बिरोबा मंदिराचा जीर्णोद्धार झाला. एकदा तुकोजीरावांच्या 'मयूर' नावाच्या घोड्याला सर्पदंश झाला. अनेक तांत्रिक, मांत्रिक, वैद्य आणि हकीमांनी उपचार करूनही घोड्याची प्रकृती सुधारली नाही. त्यावेळी दादा शिवराम भगत यांना बोलावण्यात आले. त्यांनी कडुलिंबाची पाने व गोवरीची राख घेऊन बिरोबाचा धावा केला. त्यांच्या उपचारानंतर घोडा बरा झाल्याची आख्यायिका सांगितली जाते. या घटनेने राजदरबारातील सर्वजण आश्चर्यचकित झाले. यानंतर तुकोजीरावांनी साकूर येथील बिरोबा देवस्थानाची माहिती जाणून घेतली. देवाने स्वप्नात दर्शन देऊन मंदिराचा जीर्णोद्धार करण्याची प्रेरणा दिल्याची परंपरागत कथा आहे. त्यानुसार तुकोजीराव साकूर येथे आले. त्यांनी विठ्ठल-बिरदेव मंदिराचे दर्शन घेतले आणि मंदिराचा जीर्णोद्धार कोटबांधणीसह पूर्ण केला. धुपेश्वर ओढ्याचे पाणीही त्यांना विशेष आवडले आणि ते पाणी इंदूरला नेले जात असल्याचे सांगितले जाते.



**राधामाता आणि होळकर घराण्याला वारस -**

मंदिराच्या जीर्णोद्धाराच्या काळात तुकोजीराव साकूर येथे सुमारे एक महिना मुक्कामी होते. याच काळात त्यांनी बिरोबाचे पुजारी दादा शिवराम भगत यांची बहीण जोधाबाई यांच्याशी विवाहाची इच्छा व्यक्त केली. जोधाबाई उर्फ राधामाता या त्यांच्या चौथ्या राणी झाल्या.

काही काळानंतर राणी राधामाता यांच्या पोटी पुत्ररत्नाचा जन्म झाला. बाळासाहेब ऊर्फ शिवाजीराव यांच्या रूपाने होळकर घराण्याला वारस मिळाला, अशी देवस्थानाशी संबंधित परंपरागत कथा आहे. त्यानंतर होळकर राजांनी भगत घराण्याला इंदूरजवळील शिमरोल येथे जमीनजुमला, पाटीलकी व जहागिरी दिली. साकूर येथेही महाल व जमिनी देण्यात आल्या.

**पार्वताबाईंची भक्ती आणि दत्तक पुत्र -**

कालांतराने भगत घराण्यात संपत्ती वाढली; मात्र बिरोबाची भक्ती कमी होत गेली. पुढे कुटुंबातील संपत्तीची वाटणी झाली आणि इंदूर व सिमरोल येथील मालमत्ताही नष्ट झाली.शिवराम भगत यांच्या निधनानंतर त्यांच्या पत्नी जिजामाता ऊर्फ पार्वताबाई यांनी वैधव्य स्वीकारले. बिरोबाचे नामस्मरण करीत त्या संगमनेर येथे स्थायिक झाल्या. पुढे श्रीमंत यशवंतराव होळकर (दुसरे) यांच्याकडून दत्तक पुत्र घेण्याची परवानगी मिळाल्यानंतर त्यांनी बिरोबाला मनोभावे साकडे घातले. भगत घराण्याचा वंश पुढे चालावा आणि बिरोबाची सेवा करणारा पुत्र मिळावा, अशी त्यांची प्रार्थना होती. त्यानंतर भाऊबंदकीतून दत्तक पुत्राचा शोध सुरू झाला. गणपती विठोबा भगत यांचा स्वभाव, विश्वासार्हता आणि देवावरील श्रद्धा पाहून पार्वताबाईंनी त्यांच्या वीरभद्र ऊर्फ रावसाहेब या मुलास दत्तक घेण्याचा निर्णय घेतला. कुटुंबीय व जाणकार मंडळींच्या संमतीने हा दत्तकविधी पार पडला.

**पुन्हा मंदिराचा जीर्णोद्धार-**

दि. १९ ऑगस्ट २००२ रोजी देवस्थान न्यासाची स्थापना झाली. श्री. वीरभद्र ऊर्फ रावसाहेब शिवराम खिल्लारी यांच्या पुढाकारातून मंदिराच्या जीर्णोद्धाराला सुरुवात झाली. होळकर घराण्याने केलेल्या जीर्णोद्धारानंतर पुन्हा भगत घराण्यातील भक्ताच्या माध्यमातून मंदिराचे काम पूर्णत्वास आले, ही या देवस्थानाच्या इतिहासातील महत्त्वाची बाब मानली जाते. पुरातन काळापासून श्रीक्षेत्र साकूर येथील बिरोबा हे महाराष्ट्रातील धनगर तसेच जंगम समाजाचे कुलदैवत मानले जाते. सर्वधर्मीयांचे श्रद्धास्थान म्हणूनही या देवस्थानाची ओळख आहे.

**धार्मिक आणि सांस्कृतिक महत्त्व -**

साकूर हे संगमनेर तालुक्यातील महत्त्वाचे व्यापारी गाव असून चंदनापुरी घाटाच्या परिसरात मुळा नदीच्या खोऱ्यात वसलेले आहे. गावात बिरोबाचे पुरातन मंदिर आहे. देवस्थानाच्या परंपरेनुसार बिरोबाचे अवतारकार्य बंगालमधील जंबू बेटापासून सुरू होऊन कर्नाटकातील नारदपूर व घोडगिरीमार्गे श्रीक्षेत्र साकूर येथे झाले.

साकूर येथे दसरा, नवरात्र आणि पालखी सोहळे साजरे होतात. श्रावण महिन्यात यात्रा महोत्सव असतो. नागपंचमीला मुख्य यात्रा भरते, तर नारळी पौर्णिमेला परिसरातील धनगर समाजाचा महामेळावा आयोजित केला जातो.

**वीरभद्राचा संदेश**

देवस्थानाशी संबंधित परंपरेत वीरभद्राचा संदेशही सांगितला जातो. सकारात्मक विचार ठेवावेत, परिस्थितीमुळे खचून जाऊ नये आणि प्रयत्नशील राहावे, असा या संदेशाचा गाभा आहे. भक्ती ही धाडस, पुरुषार्थ आणि सदाचाराशी जोडलेली असावी, असे त्यात सांगितले आहे. सर्व धर्मांचा आदर करावा, धर्मभेद व द्वेष टाळावा, स्त्रियांचा छळ करू नये, दीन-दुबळ्यांवर दया करावी आणि निरपराध व्यक्तीला त्रास देऊ नये, असा संदेश यात दिला आहे. व्यसनांपासून दूर राहण्याचा तसेच निष्काम कर्म, ज्ञान आणि भक्तीचा मार्ग स्वीकारण्याचा उपदेशही करण्यात आला आहे. जनसेवा हीच ईश्वरसेवा मानावी, प्रत्येकाने स्वतःच्या दुर्गुणांचा विचार करून त्यावर मात करण्याचा प्रयत्न करावा आणि कष्टाशिवाय भक्ती व साध्य प्राप्त होत नाही, असा संदेश या परंपरेतून दिला जातो. श्रीक्षेत्र साकूरचे विठ्ठल-बिरदेव देवस्थान हे श्रद्धा, भक्ती आणि परंपरेचे केंद्र असून होळकर घराण्याशी जोडलेला त्याचा इतिहास आजही भाविकांसाठी विशेष महत्त्वाचा आहे.

**शंकरराव खेमनर**
**सभापती, कृषी उत्तपन्न बाजार समिती, संगमनेर**

# संपादकीय...

## रक्षाबंधन : भाऊ-बहिणीच्या प्रेमाचा अनमोल धागा



रक्षाबंधन हा भारतीय संस्कृतीतील भाऊ-बहिणीच्या प्रेमाचा, जिव्हाळ्याचा आणि परस्पर विश्वासाचा उत्सव आहे. श्रावण पौर्णिमेला साजरा होणारा हा सण राखी बांधण्यापुरता मर्यादित वाटला, तरी त्यामागे असलेली भावना अत्यंत व्यापक आहे. बहिणीने भावाच्या मनगटावर बांधलेला राखीचा धागा हा केवळ संरक्षणाचे प्रतीक नसून, आयुष्यभर एकमेकांच्या सुख-दुःखात सोबत राहण्याची आणि नात्याची जपणूक करण्याची आठवण करून देतो.

बालपणीच्या आठवणींना उजाळा देणारा हा सण अनेक कुटुंबांसाठी विशेष असतो. भाऊ-बहिणीतील छोट्या-मोठ्या भांडणांपासून ते एकमेकांसाठी उभे राहण्यापर्यंतचा प्रवास या नात्याला अधिक घट्ट करत असतो. लहानपणी खेळणी, खाऊ किंवा एखाद्या छोट्या वस्तूसाठी झालेली भांडणे मोठेपणी आठवली की चेहऱ्यावर नकळत हसू उमटते. काळ बदलतो, जबाबदाऱ्या वाढतात, प्रत्येक जण आपल्या संसारात आणि कामात व्यस्त होतो; मात्र भाऊ-बहिणीचे नाते मनाच्या एका कोपऱ्यात कायम जिवंत राहते. रक्षाबंधन हा त्या नात्याला पुन्हा एकदा उजाळा देणारा दिवस आहे. आजच्या धावपळीच्या जीवनात माणसाकडे वेळ कमी झाला आहे. मोबाईल, सोशल मीडिया आणि डिजिटल संवादामुळे अंतर कमी झाले असले तरी प्रत्यक्ष भेटींची ऊब काहीशी कमी होत चालली आहे. अशा परिस्थितीत रक्षाबंधनासारखे सण नात्यांना पुन्हा जवळ आणण्याचे काम करतात. बहिणीने स्वतःहून भावाच्या घरी जाऊन राखी बांधणे, भावाने बहिणीला भेटवस्तू देणे, एकत्र भोजन करणे आणि जुन्या आठवणींना उजाळा देणे, या साध्या कृतींमध्ये नात्याची खरी श्रीमंती दडलेली आहे.

मात्र रक्षाबंधनाचा अर्थ केवळ बहिणीच्या संरक्षणाची जबाबदारी भावाने स्वीकारणे इतकाच मर्यादित ठेवणे योग्य नाही. आजच्या काळात भाऊ आणि बहीण दोघेही एकमेकांच्या आधाराची गरज असलेले सहप्रवासी आहेत. बहिणीच्या स्वप्नांना पाठिंबा देणे, तिच्या निर्णयांचा आदर करणे, तिच्या शिक्षणाला आणि करिअरला प्रोत्साहन देणे हीदेखील भावाची जबाबदारी आहे. त्याचप्रमाणे भावाच्या अडचणीच्या काळात त्याला मानसिक आधार देणे, त्याच्या यशात आनंद मानणे आणि गरजेच्या वेळी खंबीरपणे सोबत उभे राहणे, हे बहिणीच्या प्रेमाचे रूप आहे. रक्षाबंधनाच्या निमित्ताने समाजानेही स्त्रीच्या सुरक्षिततेचा आणि सन्मानाचा विचार करण्याची गरज आहे. प्रत्येक मुलगी, महिला आणि बहिणीला सुरक्षित वातावरण मिळणे ही केवळ तिच्या भावाची नव्हे, तर संपूर्ण समाजाची जबाबदारी आहे. 'बहिणीचे रक्षण' ही भावना घराच्या चौकटीबाहेर नेऊन प्रत्येक स्त्रीच्या सन्मानाचे रक्षण करण्याची सामाजिक बांधिलकी निर्माण झाली पाहिजे. महिलांना समान संधी, शिक्षण, स्वावलंबन आणि निर्णयस्वातंत्र्य मिळणे हीच आधुनिक काळातील रक्षाबंधनाची खरी भावना ठरू शकते.

आज अनेक भाऊ-बहिणी शिक्षण, नोकरी किंवा व्यवसायामुळे वेगवेगळ्या शहरांत, राज्यांत किंवा देशांत राहतात. त्यामुळे प्रत्यक्ष भेट शक्य नसली तरी भावनेतील अंतर वाढू नये, हे अधिक महत्त्वाचे आहे. व्हिडिओ कॉलवरून शुभेच्छा देणे, कुरिअरने राखी पाठवणे किंवा ऑनलाइन भेटवस्तू पाठवणे या आधुनिक पद्धती असल्या तरी त्यामागची भावना खरी असेल तर नात्याची ऊब कायम राहते. अंतर कितीही असले तरी मनातील जिव्हाळा कमी होऊ नये, हाच या सणाचा संदेश आहे. रक्षाबंधन आपल्याला आणखी एक महत्त्वाचा धडा देते-नाती केवळ रक्ताच्या नात्याने टिकत नाहीत, तर ती विश्वासाने टिकतात. आयुष्यात यश, पैसा, पद आणि प्रतिष्ठा मिळवताना माणूस अनेक गोष्टी कमावतो; परंतु संकटाच्या वेळी आपल्यासाठी निःस्वार्थपणे उभे राहणारी माणसे हीच खरी संपत्ती असतात. भाऊ-बहिणीचे नाते अशाच निःस्वार्थ प्रेमाची आठवण करून देते. राखीचा धागा छोटा असतो; पण त्यात भावना मोठी असते. तो मनगटावर काही दिवस राहतो, मात्र त्यामागची आठवण आयुष्यभर मनात राहू शकते.

# हुशार चिमुकल्यांना मिळाले शिक्षणाचे बळ



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर : दारसोंडवाडी, पोस्ट भोजदरी, ता. संगमनेर येथील अत्यंत गरिबीच्या परिस्थितीत जीवन जगणाऱ्या दोन हुशार बहिणींना आधार फाउंडेशन, संगमनेरच्या माध्यमातून शैक्षणिक साहित्याची मदत करण्यात आली.

कु. साक्षी सुरेश कडाळे (इयत्ता तिसरी) आणि कु. समीक्षा सुरेश कडाळे (इयत्ता सहावी) या दोघी बहिणी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, दारसोंडवाडी येथे शिक्षण घेत आहेत. त्यांच्या आयुष्यात लहान वयातच मोठे दुःख आले. वडिलांचे निधन झाल्यानंतर दहाव्याच्या दिवशीच आईनेही त्यांना सोडून दिले. त्यानंतर वयोवृद्ध आजी-आजोबा या दोन्ही चिमुकल्यांचा सांभाळ करत आहेत. दारसोंडवाडी हा दुर्गम आदिवासी भाग असून, प्रतिकूल परिस्थिती असतानाही साक्षी आणि समीक्षा या दोघीही अभ्यासात हुशार व चुणचुणीत आहेत. त्यांच्या शिक्षणाची जिद्द आणि परिस्थितीची जाणीव घेत आधार फाउंडेशनने त्यांची नोंद घेत शैक्षणिक मदतीचा हात पुढे केला. फाउंडेशनच्या माध्यमातून दोघींना शैक्षणिक साहित्य, वह्या, पेन तसेच रंगीत ड्रेस देण्यात आले. मदत मिळाल्यानंतर त्यांच्या चेहऱ्यावर उमटलेले हास्य, डोळ्यांतील चमक आणि आनंद पाहून उपस्थितांचेही मन हेलावून गेले. या मदतीमुळे त्यांच्या शिक्षणाला केवळ साहित्याचा आधार मिळाला नाही, तर त्यांच्या स्वप्नांना नवी दिशा आणि पुढे जाण्याची प्रेरणाही मिळाली आहे. मागील वर्षीही आधार फाउंडेशनच्या 'शैक्षणिक दत्तक पालक योजने'तून या दोन्ही बहिणींना मदत करण्यात आली होती. गरजू आणि होतकरू विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला हातभार लावण्याचे काम फाउंडेशनकडून सातत्याने केले जात आहे. 'दहा रुपयांची किमया' या संकल्पनेतून आधार फाउंडेशन समाजातील गरजू घटकांना मदतीचा आधार देत असून, साक्षी आणि समीक्षेसारख्या चिमुकल्यांच्या शिक्षणासाठी उचललेले हे पाऊल निश्चितच प्रेरणादायी ठरत आहे.

# महाडीबीटीसाठी विद्यार्थ्यांना महाआयडी बंधनकारक

## आधार लॉगिन आवश्यक; प्रलंबित अर्ज ३० ऑगस्टपर्यंत निकाली काढण्याचे आवाहन

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती (फ्रीशिप), राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती आदी योजनांचा लाभ मिळवण्यासाठी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून महाडीबीटी २.० या नवीन प्रणालीवर अर्ज प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. या प्रणालीवर अर्ज करण्यासाठी विद्यार्थ्यांनी सर्वप्रथम नवीन महाआयडी (चरहरश्रऊ) तयार करणे आवश्यक असून, जुन्या पोर्टलवरील आयडी व पासवर्ड यापुढे ग्राह्य राहणार नाहीत. विद्यार्थ्यांनी आपल्या आधार क्रमांकाचा वापर करून नवीन महाआयडी तयार करणे आवश्यक आहे. आधार पोर्टलवरील विद्यार्थ्यांची माहिती अचूक व अद्ययावत असणे आवश्यक आहे.

नवीन अर्ज तसेच नूतनीकरणाच्या अर्जासाठीही नवीन महाआयडी आणि आधार लॉगिन करावे लागणार आहे. नूतनीकरण करणाऱ्या विद्यार्थ्यांनी लॉगिन केल्यानंतर 'माझा अर्ज नूतनीकरण करायचा' हा पर्याय निवडावा. अर्जासोबत आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे स्पष्ट व वाचनीय पीडीएफ (झऊऋ) स्वरूपात अपलोड करणे आवश्यक आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी अर्ज भरताना कागदपत्रांची पूर्तता आणि आधारवरील माहितीची अचूकता तपासूनच अर्ज सादर करावा. दरम्यान, शैक्षणिक वर्ष २०२५-२६ व त्यापूर्वीच्या वर्षांतील अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती, फ्रीशिप व राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती योजनांचे अर्ज वारंवार सूचना देऊनही विद्यार्थी आणि महाविद्यालय स्तरावर मोठ्या प्रमाणात प्रलंबित आहेत. त्यामुळे महाविद्यालयांनी प्रलंबित अर्जांची तातडीने तपासणी करून त्रुटी असल्यास संबंधित विद्यार्थ्यांशी संपर्क साधून त्या दूर कराव्यात. परिपूर्ण अर्ज ३० ऑगस्ट २०२६ पर्यंत जिल्हा कार्यालयाकडे मंजुरीसाठी पाठविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. महाविद्यालय स्तरावरील प्रलंबित अर्जांची पूर्तता करून घेण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांची राहणार आहे.

तसेच सन २०२६-२७ मधील अर्ज भरण्याची सुविधादेखील सुरू करण्यात आलेली आहे. सबब २०२६-२७मध्ये मॅट्रीकोत्तर शिक्षण घेत असणाऱ्या सर्व अनुसूचित जाती प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना अर्ज भरण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

# बीजमातेच्या गावरान बियाण्यांच्या राख्या.....



युवावार्ता (प्रतिनिधी)

राजूर - सोनियाच्या ताटी उजळल्या ज्योती ओवाळीते भाऊ राया रे वेड्या बहिणीची रे वेडी माया ! या मराठी गीतातील सुंदर ओळींमधून बहीण भावाच्या नात्याची आपुलकी आणि माया आपल्या डोळ्यासमोर उभी राहते. अगदी या गीताला शोभेल असेच तालुक्यातील पद्मश्री राहीबाई सोमा पोपेरे यांनी आपल्या भावासाठी म्हणजेच चंद्रकांत दादा पाटील यांच्यासाठी बीज राखी बनवून एक अनोखी व जगावेगळी भेट आपल्या भावाला दिलेली आहे. भात, नागली, वरई, काकडी, भोपळा, तूर ,मूग, उडीद, वाल, काकडी , घोसाळी, डांगर भोपळा यासारख्या अनेक प्रकारच्या गावरान बियांचा वापर करून त्यांनी या राख्या स्वतःच्या हाताने बनवलेल्या आहेत. चंद्रकांत दादा पाटील यांना बंधू मानलेल्या पद्मश्री राहीबाई यांनी आजपर्यंत बीज बँकेच्या रूपाने महाराष्ट्रातील हजारो शेतकऱ्यांना आपल्या विशेष प्रेमाने व गावरान बीज संवर्धन व पुरवठा करून आदराने आपले भाऊ बनवून घेतले आहे. राहीबाई यांच्या वात्सल्य आणि प्रेमापोटी हजारो शेतकरी त्यांना आपली बहीण मानतात. या शेतकऱ्यांच्या प्रेमापोटी व त्यांचा मनस्वी आदर राखण्यासाठी त्यांनी या बीज राख्यांची निर्मिती केली आहे.चंद्रकांत दादा पाटील राहीबाई यांना आपल्या भगिनी मानतात व राहीबाई सुद्धा त्यांना तेवढेच आदराचे स्थान देतात हे सर्वश्रुत आहे. आपल्या या प्रेमळ भावासाठी त्यांनी बीज राख्यांची विशेष मोहीम राबवली आहे. त्याचप्रमाणे देशाच्या सीमेवर लढणाऱ्या सैनिकांच्या प्रती प्रेम आणि आदर भावना मनामध्ये ठेवून एक धागा राष्ट्रबांधणीचा या विचारांना पुढे नेण्यासाठी त्यांनी या राख्या बनवल्याचे सांगितले आहे. देशाच्या सीमांचे रक्षण करणाऱ्या सैनिकांसाठी सुद्धा त्यांनी बीज राख्या भेट म्हणून देशाच्या सीमेवर पाठवले आहेत. बीज राख्यांची निर्मिती करून त्यांनी करत असलेल्या कार्याप्रती आपण किती एकनिष्ठ आणि एकरूप आहोत हे दाखवून दिले आहे. कुठलेही काम निष्ठेने केल्यास तेच काम आपल्याला सर्वोच्च स्थानी नेत असते हेच वेळोवेळी राहीबाईंच्या उदाहरणातून समोर आले आहे. राखी पौर्णिमा या सणानिमित्त त्यांनी सर्व देश बांधवांना बीज राखीच्या रूपाने अनोखी भेट व शुभेच्छा दिल्या आहेत. यावर्षी राहीबाई यांना त्यांची नातवंड सायली, धनश्री, यांनी सुद्धा बीज- राख्या बनवण्यासाठी मोलाची मदत केली आहे.

# आश्वासनानंतर ब्राह्मणवाडा ग्रामस्थांचे उपोषण मागे

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले- अवैध दारूविक्रीला आळा, ब्राह्मणवाडा-बोटा रस्त्यासह अपूर्ण रस्त्यांची कामे आणि जलजीवन मिशनच्या निकृष्ट कामांची चौकशी अशा विविध मागण्यांसाठी ब्राह्मणवाडा ग्रामस्थांनी सुरू केलेले आमरण उपोषण मंगळवारी (दि. २५) रात्री प्रशासनाच्या लेखी आश्वासनानंतर मागे घेण्यात आले.

पालकमंत्री विखे-पाटील यांनी मध्यस्थी करत संबंधित अधिकाऱ्यांना ग्रामस्थांच्या मागण्यांवर तातडीने तोडगा काढण्याच्या सूचना दिल्या. त्यानंतर निवासी नायब तहसीलदार किसन लोहरे, नायब तहसीलदार बांबळे, मंडळ अधिकारी मंगेश फापाळे व पोलीस विभागाचे देशमुख यांनी उपोषणस्थळी दाखल होत ग्रामस्थांशी चर्चा केली. प्रशासनाने दिलेल्या लेखी हमीनुसार जलजीवन मिशनच्या प्रलंबित कामांवर कार्यवाही करण्याचे आश्वासन देण्यात आले.

ब्राह्मणवाडा-बोटा रस्त्याच्या सुमारे चार किलोमीटर कामाला मंजुरी मिळून निविदा प्रक्रिया झाल्याची माहिती बांधकाम विभागाने दिली असून, उर्वरित रस्त्याचा प्रस्ताव चालू अर्थसंकल्पात शासनाकडे पाठविण्याची हमी देण्यात आली. मुक्ताईवाडी तसेच इतर अपूर्ण रस्त्यांची कामेही मार्गी लावण्याचे आश्वासन देण्यात आले. अवैध दारूविक्री करणाऱ्यांवर कायद्यानुसार गुन्हे दाखल करण्याची कार्यवाही केली जाईल, तसेच दारूबंदी समिती, ग्रामसुरक्षा दल व दारूबंदीच्या कामात सहभागी तरुणांवर विनाकारण गुन्हे दाखल केले जाणार नाहीत, अशी हमी पोलिसांनी दिली. उपसरपंच सुभाष गायकर यांनी लेखी आश्वासनानंतर उपोषण मागे घेत असल्याचे सांगितले. मात्र, आश्वासनांची अंमलबजावणी झाली नाही तर ग्रामस्थ पुन्हा आक्रमक भूमिका घेतील, असा स्पष्ट इशारा त्यांनी दिला. आंदोलनाला महिला, तरुण, ग्रामस्थ, व्यापारी तसेच लहित, करंडी, कळंब परिसरातील नागरिक व सामाजिक कार्यकर्त्यांचा पाठिंबा मिळाला.





पाहिजेत

युवा ध्येय वृत्तपत्र संगमनेर कार्यालयासाठी अर्जंट पाहिजे

उपसंपादक - १ M
जाहिरात व्यवस्थापक - १ M
डिझायनर - १ M/F
टेलिकॉलर - १ M/F

कार्यालय - युवा ध्येय, विठ्ठल स्मृती कॉम्प्लेक्स, अकोले रोड, संगमनेर

फोन (०२४२५)२६१८७२
७७६८०७९२७२,९३७०७७३५०४

भाड्याने देणे आहे

सर्व सुविधायुक्त ०१ बीएचके रो - हाऊस भाड्याने देणे आहे

सुकेवाडी रोड, संगमनेर

8282825818

कामासाठी मुले, मुली पाहिजेत

अकाऊंटंट - १ (म.)
हेल्पर - १ (पु.)
सेल्समन - १ (पु./ म.)

कामाचा अनुभव आवश्यक

9422905155
9763232269

पाहिजेत

स्पेशल सिक्युरिटी फोर्स व बाऊन्सर सर्विसेस

सिक्युरिटी गार्ड - ५
महिला - ३
सफाई कर्मचारी - ५
हेल्पर - ५

पार्ट टाइम /फुल टाइम काम मिळेल ( सेक्युरिटी गार्ड

संपर्क - तिरंगा चौक, मालदाड रोड, संगमनेर

7709828846

पाहिजेत

जानकीराम गंगाधर काजळे ज्वेलर्ससाठी

सेल्स एक्झीक्युटिव्ह -४
मार्केटिंग एक्झीक्युटिव्ह -४
हेल्पर - २

मेन रोड, संगमनेर

7588249849

पाहिजेत

सुंदरम गोल्ड आणि प्लास्टिक, संगमनेर

ऑफसेट मशिन ऑपरेटर १ जागा
स्क्रिन प्रिटींग – २ जागा
टेलीकॉलर – २ (महिला)

– संपर्क –

९८२२४५३०३६

पाहिजेत

राजवीर फार्मा

मेडीकल एजन्सी कामाकरिता फक्त गरजुंनी संपर्क साधावा

पुरूष – ४ जागा
(वय- १८ ते ४०)

रविवार सुट्टी असते
आकर्षक पगार व बोनस

ठिकाण– जाणता राजा रोड, मुथुट फायनान्स पाठीमागे,२ नं गल्ली, संगमनेर

8669184141

फ्लॅट विकणे आहे

2 BHK फ्लॅट विकणे आहे
नवीन बांधकाम,
स्वतंत्र पार्किंगसह

ठिकाण: वृंदावन हाईट्स, चंद्रशेखर चौक, संगमनेर

– संपर्क –

8788945208
8208223721

SR THORAT | JOB | GAGANGIRI PACKAGED PURITY

| Sr. No. | Post | QTY | Qualification and Experience |
|---|---|---|---|
| 1 | Security Guard | 5 | Experience Minimum 5 Year (Ex-Servicemen preferred) |
| 2 | Fitter/Welder/ Mechanical/ Electrical/ Refrigeration | 5 | ITI,DME or any Graduate, Experience Minimum 3 Year, Age below 30 Year |
| 3 | Data Operator/ Supervisor | 5 | Any Graduate, Experience Minimum 3 Year, Age below 30 Year |
| 4 | Chemist | 5 | B.Sc. Experience Minimum 3 Year, Age below 30 Year |

Office Address-S.R.Thorat Milk Products Pvt.Ltd, Rajapur Road,Sangamner, Dist- Ahilyanagar

Mobile Number – 9860100936/937

Sent the CV Following E-Mail Id:

admin@srthoratmilk.com / hr@srthoratmilk.com



पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
ताम्हाणे हॉस्पिटल
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
आधुनिक उपचार पद्धती
• कमी वेदना, जलद बरे होणे
• लेझर व प्रगत तंत्रज्ञान
• अनुभवी तज्ञ डॉक्टरांचा सल्ला
• गोपनीयतेची पूर्ण काळजी
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक युवावार्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

आपल्या व्यवसायाची
जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९६६६०४
७६२०३८८२३०



श्री महाकालेश्वराचे अलौकिक दर्शन!
श्रावण मासानिमित्त भक्ती शक्ती मंदिरात, उज्जैनच्या
श्री महाकालेश्वराचा प्रतिरूपाचे दर्शनाचा लाभ घ्यावा.
श्रावण मासारंभ निमित्त सर्वांना हार्दिक शुभेच्छा !
भक्ती शक्ती मंदिर
डेरे फाउंडेशन कॅम्पस, कऱ्हे फाटा, नाशिक-पुणे हायवे, संगमनेर

# संगमनेर महाविद्यालयाला 'अधिकारप्रदत्त स्वायत्त' दर्जा

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची दहा वर्षांसाठी मान्यता




युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर : शैक्षणिक गुणवत्ता, पायाभूत सुविधा, संशोधन, नवोपक्रम आणि विद्यार्थीकेंद्रित उपक्रमांच्या बळावर शिक्षण प्रसारक संस्थेच्या संगमनेर नगरपालिका कला, दा. ज. मालपाणी वाणिज्य व ब. ना. सारडा विज्ञान महाविद्यालयाने आणखी एक मानाचा टप्पा गाठला आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने महाविद्यालयाला 'अधिकारप्रदत्त स्वायत्त महाविद्यालय' (Empowered Autonomous College) हा प्रतिष्ठेचा दर्जा बहाल केला आहे. शैक्षणिक वर्ष २०२६-२७ ते २०३५-३६ या दहा वर्षांसाठी ही मान्यता देण्यात आली आहे.

महाविद्यालयाला यापूर्वी नॅककडून A+ (३.५८) ग्रेड मिळाली असून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा 'उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार' तीन वेळा प्राप्त झाला आहे. १५ जुलै २०२० रोजी महाविद्यालयाला स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जाही मिळाला होता. गेल्या सहा वर्षांत अभ्यासक्रम विकास, कौशल्याधारित व रोजगाराभिमुख शिक्षण, संशोधन, नवोपक्रम, औद्योगिक प्रशिक्षण आणि छएझ २०२०च्या अंमलबजावणीसाठी केलेल्या उल्लेखनीय कामाची दखल घेत हा नवा दर्जा देण्यात आला आहे.

अभ्यासक्रमांमध्ये अधिक स्वायत्तता या दर्जामुळे महाविद्यालयाला नियमांच्या चौकटीत नवीन प्रमाणपत्र, डिप्लोमा, पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करणे, विद्यमान अभ्यासक्रमांची पुनर्रचना करणे, कौशल्याधारित व रोजगाराभिमुख अभ्यासक्रम विकसित करणे तसेच संशोधन व नवोपक्रमाला अधिक चालना देणे शक्य होणार आहे. उद्योग-शिक्षण सहकार्य वाढवून स्थानिक गरजांनुसार अभ्यासक्रम विकसित करण्यालाही यामुळे मदत होणार आहे.

महाविद्यालयात सध्या डेअरी प्रॉडक्ट्स अ‍ॅण्ड प्रोसेसिंग, अ‍ॅग्रीकल्चर अ‍ॅण्ड सॉईल सायन्स, सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट, हॉस्पिटॅलिटी अ‍ॅण्ड टुरिझम आणि अकौंटिंग अ‍ॅण्ड टॅक्सेशन हे पाच बी. व्होक अभ्यासक्रम सुरू आहेत. छडड, छउउ, क्रीडा आणि विविध कौशल्याधारित उपक्रमांतून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर दिला जात आहे.

पदवी प्रमाणपत्रावर महाविद्यालयाचे नाव या दर्जाचा विद्यार्थ्यांना विशेष लाभ मिळणार असून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून देण्यात येणाऱ्या पदवी प्रमाणपत्रावर महाविद्यालयाचे नाव व बोधचिन्ह नमूद केले जाणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रमाणपत्रावर महाविद्यालयाची स्वतंत्र ओळख अधोरेखित होणार आहे. शिक्षण प्रसारक संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. संजय मालपाणी म्हणाले, २०२० मध्ये स्वायत्ततेचा दर्जा मिळाल्यानंतर त्याचा उपयोग विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी केला. आता 'अधिकारप्रदत्त स्वायत्त' दर्जा मिळणे ही त्या प्रयत्नांना मिळालेली मोठी पावती आहे. हा सन्मान संस्थेशी जोडलेल्या सर्व घटकांच्या सामूहिक प्रयत्नांचा गौरव आहे.

प्राचार्य प्रो. डॉ. अरुण गायकवाड म्हणाले, अधिकारप्रदत्त स्वायत्तता ही सन्मानासोबतच मोठी जबाबदारी आहे. विद्यार्थ्यांना आधुनिक, कौशल्याधारित व रोजगाराभिमुख शिक्षण देण्यासोबतच संशोधन, उद्योगसहकार्य आणि छएझ २०२०च्या प्रभावी अंमलबजावणीला अधिक गती देण्यात येईल.

# नेपाळ महाप्रलयात शेकडोंचा बळी, हजारो नागरीक बेपत्ता



नेपाळ - नेपाळ-तिबेट सीमेवर आलेल्या अचानक आलेल्या विनाशकारी पुरामुळे १६८ लोकांचा मृत्यू झाला. यापैकी १६५ नेपाळमध्ये आणि ३ तिबेटमध्ये होते. १,१०० हून अधिक लोक अजूनही बेपत्ता आहेत. नेपाळमध्ये बेपत्ता झालेल्यांमध्ये ४६६ परदेशी आणि ११३ नेपाळी नागरिकांचा समावेश आहे. यामध्ये १०५ भारतीय आणि ३७ अनिवासी भारतीयांचा समावेश आहे. चीनच्या अधिकृत वेबसाइट उउढत नुसार, तिबेटमध्ये ५५० हून अधिक लोक बेपत्ता आहेत. खराब हवामान आणि तुटलेल्या रस्त्यांमुळे ढिगाऱ्याखाली अडकलेल्या लोकांचा शोध मदत आणि बचाव पथके घेत आहेत. नेपाळी सैन्याने रसुवा येथील तिमुरेमधून ११६ लोकांना वाचवले. यामध्ये ९५ नेपाळी आणि २१ भारतीयांचा समावेश आहे.बुधवारी सकाळी ८ वाजून ३७ मिनिटांनी नेपाळ-चीन सीमेजवळ, काठमांडूच्या उत्तरेला जोरदार भूकंपाचे धक्के जाणवले. सुरुवातीला, यूएस जिओलॉजिकल सर्व्हे ने हा ४.४ तीव्रतेचा भूकंप असल्याचे सांगितले. या दरम्यान, बर्फ आणि खडकांसह पर्वताचा एक मोठा भाग कोसळून ल्हेंडे खोला नदीत पडला. ही नदी भोटेकोशी नदीची उपनदी आहे, जी चीनमध्ये उगम पावते आणि खोल दऱ्यांमधून नेपाळमध्ये प्रवेश करते. शास्त्रज्ञांचा असा विश्वास आहे की, हिमनदीचा एक मोठा भाग पर्वतापासून तुटून खाली पडला असावा.

# घरफोडी - सव्वा लाखांचे दागिने लंपास

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- तालुक्यातील येथे बंद घराचे कुलूप उघडून अज्ञात चोरट्याने घरात प्रवेश केला आणि कपाटातील सुमारे १ लाख २० हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरून नेल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी संगमनेर तालुका पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सावरगाव तळ येथील रहिवासी अर्जुन मनाजी नेहे (वय ५२ वर्षे) हे आपल्या पत्नीसमवेत राहतात. त्यांचा मुलगा नोकरीनिमित्त पनवेल येथे राहतो. घरातील कपाटामध्ये सोन्याचे दागिने ठेवण्यात आले होते. नेहे दाम्पत्य घरातील कपाट आणि लॉकर नेहमी लॉक करत नसल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. रविवार (दि. २३ ऑगस्ट) रोजी सकाळी सुमारे ११.४५ वाजता नेहे दाम्पत्य १२ ग्रॅम वजनाचे सोन्याचे झुबे, घराच्या दोन्ही खोल्यांना कुलूप लावून पडवीतील। फिल्टरवर चावी ठेवून, पाहुण्यांना भेटण्यासाठी कहांडळवाडी येथे गेले होते. त्यानंतर सायंकाळी ६.३० वाजता ते घरी परतले असता किचनच्या दरवाजाचे कुलूप उघडलेले मात्र अडकवलेल्या स्थितीत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. घरात पाहणी केली असता किचनमधील डब्यांची उचकापाचक झाल्याचे आढळून आले. त्यानंतर शेजारील खोलीचे कुलूप उघडून पाहिले असता कपाटातील साड्या व इतर कपडे व्यवस्थित होते. मात्र कपाटातील लॉकरमध्ये ठेवलेले दागिने गायब असल्याचे आढळले. चोरीस गेलेल्या वस्तूंमध्ये ७० हजार रुपये किमतीचे सुमारे १२ ग्रॅम वजनाचे सोन्याचे झुबे तसेच अंदाजे ५० हजार रुपये किमतीची काळ्या मण्यांमध्ये गुंफलेली सोन्याची पोत, त्यामध्ये सुमारे २ ग्रॅम वजनाचे दोन रामपान व सोन्याचे मणी अशा एकूण १ लाख २० हजार रुपये किमतीच्या दागिन्यांचा समावेश आहे. अज्ञात चोरट्याने घरात प्रवेश करून किचनमधील साहित्याची उचकापाचक केली. त्यानंतर शेजारील खोलीतील कपाटातून दागिने चोरून पुन्हा दरवाजाला कुलूप लावून चावी पूर्वी ठेवलेल्या ठिकाणी ठेवली असावी, असा संशय तक्रारीत व्यक्त करण्यात आला आहे.

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
• मेडि असिस्ट इन्शुरन्स प्रा.लि.
• पॅरामाऊंट हेल्थ इन्शुरन्स
• हेल्थ इंडिया इन्शुरन्स
• FHPL हेल्थ इन्शुरन्स
• इरिक्सन इन्शुरन्स प्रा.लि.
• बजाज आलियांज इन्शुरन्स
• एसबीआय जनरल इन्शुरन्स
• ईस्ट वेस्ट असिस्ट हेल्थ केअर
• मेडसेव टीपीए प्रा.लि.
• जेनिन्स इंडिया टीपीए लि.
• ICICI लोम्बार्ड हेल्थ केअर
• टाटा एआयजी इन्शुरन्स
• रिलायन्स जनरल इन्शुरन्स
• मुख्यमंत्री सहाय्यता निधी (CMRF)
सर्व प्रकारचे मेडिक्लेम कॅशलेस सुविधा उपलब्ध
• चोलामंडलम हेल्थ इन्शुरन्स
• नॅशनल इन्शुरन्स कं.
• न्यू इंडिया इन्शुरन्स कं.
• निवा बुपा हेल्थ इन्शुरन्स
• युनायटेड इंडिया इन्शुरन्स कं.
• स्टार हेल्थ इन्शुरन्स कं.
• दि ओरिएंटल इन्शुरन्स लि.
• एचडीएफसी एर्गो इन्शुरन्स
• युनायटेड हेल्थकेअर लि.
• Go digit हेल्थ इन्शुरन्स कं.
• मणिपाल सिग्ना हेल्थ इन्शु.
• एम.डी.इंडिया हेल्थकेअर
• विडाल हेल्थकेअर प्रा.लि.
• पोलिस कुटुंब कल्याण आरोग्य योजना (MPKAY)
02425 - 224761, मोबा. 7038170382

नोकरीची सुवर्णसंधी
'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'
(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे
पदे: Field Sales Executive
Business Development Manager
कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग
पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक
सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा
संपर्क - RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165

दर्शन टेक्सटाईल मार्केट
तुमच्या प्रत्येक लूकसाठी खास डिझाइन्स
30% ते 70% डिस्काउंट सेल
सेल नव्हे होलसेल सेल
मान्सून ऑफर
टी शर्ट | जिन्स | फॉर्मल ड्रेस
ब्लेझर | जाकेट
संपर्क :- 8390005001 पत्ता:- जाणता राजा मार्ग, IDBI बँक समोर, संगमनेर 422605

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात
अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी
आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
* कर्ज रक्कम वाढ । * कर्ज व्याजदर कमी । * कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु।।, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

मार्स युनिव्हर्स
प्रायव्हेट लिमिटेड
टूर्स, ट्रॅव्हल्स आणि कॉर्पोरेट सर्व्हिसेस
तुमचे पाऊल मंगळावर ठेवण्यासाठी
मार्स युनिव्हर्स सज्ज
प्रति व्यक्ती 59,000/-* (फुकेत, बँकॉक)
प्रति व्यक्ती 79,000/-* (व्हिएतनाम, सिंगापूर, बाली)
१ ला ग्रुप - 26 सप्टेंबर
२ रा ग्रुप - 1 ऑक्टोबर
३ रा ग्रुप - 10 ऑक्टोबर
संपर्क - किशोर सोनवणे
9309429705

कुटे हॉस्पिटल
अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा
पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना
ॲम्बुलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायक्षेत्र) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25

शुक्रवार
२८
ऑगस्ट २०२६

वर्ष १९ वे
अंक - २०९
पान नं. ६
किंमत - ४ रुपये

दैनिक युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

संपादिका : सौ. सुशीला किसन हासे (बी. ए.)
संस्थापक : किसन भाऊ हासे (बी. जे.)
कार्यकारी संपादक : सुदीप किसन हासे (एम.ई.)

RNI No. MAHMAR/2007/24252
पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2023-25

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com




विशेष लेख

# विठ्ठल-विरभद्र देवांचे साकूर क्षेत्री आगमन

कलियुगात खऱ्या भक्ताचा शोध घेण्यासाठी आणि भक्तीचा महिमा वाढविण्यासाठी विठ्ठल-बिरदेव देशपर्यटनास जाण्याचा विचार करू लागले. कैलासावर शिव-पार्वती विचारविनिमय करीत असताना वीरभद्र तेथे आले. त्यांनी माता-पित्यांना नमस्कार करून भवानीमातेची सेवा करण्याची इच्छा व्यक्त केली. देवीने त्यास संमती दिली. वीरभद्राने भवानीमातेला खिल्लारी कपिला गायीच्या रूपात प्रकट होऊन कर्नाटकातील घोडगिरी येथील बंजारा बाबाच्या तांड्यात सामील होण्यास सांगितले. आपण त्या गायीच्या खुरात गुप्तरूपाने राहून तिची चरणसेवा करू, असे त्यांनी सांगितले. तसेच श्रीहरी विष्णूंनी श्री क्षेत्र साकूर येथील महान शिवभक्त धनगर कुटुंबात विठोबारूपाने अवतार घ्यावा, अशी विनंती केली.

कर्नाटकातील घोडगिरी येथे एका लमाणी बाबाचा गाई, शेळ्या व मेंढ्यांचा तांडा मुक्कामास होता. भवानीमातेने कपिला गायीचे रूप धारण करून त्या कळपात प्रवेश केला, तर वीरभद्र देवाने तिच्या खुरात गुप्तरूपाने प्रवेश केला. तांड्याच्या प्रवासादरम्यान लमाणबाबाच्या लक्षात आले की, कळपात एक नवीन गाय आली आहे आणि ती एका पायाने लंगडत आहे. तिला कळपातून हाकलण्याचा प्रयत्न करूनही ती परत येत असे. तिच्यावर अनेक औषधोपचार करण्यात आले; मात्र तिचे लंगडणे थांबले नाही. गावोगावी भटकत हा तांडा तब्बल बारा वर्षांनी गोदावरी नदीच्या काठाने श्री क्षेत्र साकूरच्या नगरकुसावर आला. चांदण्या माळ, धुपेश्वर ओढा आणि मुळा नदीचा संगम हे रमणीय ठिकाण माता भवानी आणि वीरभद्र देवांना आवडले. याच ठिकाणी प्रकट होण्याचे त्यांनी ठरविले.

दरम्यान, साकूर नगरात एक शिवभक्त धनगर कुटुंब राहत होते. ते नित्यनेमाने धुपेश्वर महादेवाची पूजाअर्चा करीत. त्यांच्या खडतर आराधनेने प्रसन्न झालेल्या शिवप्रभूंनी त्यांना वरदान मागण्यास सांगितले. मूलबाळ नसल्याचे त्यांनी सांगितल्यावर, 'तुमच्या कुळात काही दिवसांनी श्रीहरी विष्णूचा अवतार होईल,' असा आशीर्वाद देऊन देव अंतर्धान पावले. काही दिवसांनी श्रीहरी विष्णूंनी त्या धनगर कुटुंबात बालरूपाने अवतार घेतला. लहानपणापासूनच ते शिवभक्तीत लीन असत. भजने, आरत्या आणि ईश्वरचिंतन करण्यात त्यांना आनंद मिळत असे. त्यांचा विरक्त स्वभाव आणि भक्ती पाहून आई-वडिलांनी त्यांचे नाव 'विठू' ठेवले. ते मेंढरांच्या पिलांना दूध पाजत, गायींची पूजा करीत आणि वासरांबरोबर खेळत असत.

**साकूरमध्ये बिरोबाचा प्रकट होण्याचा प्रसंग**

एके रात्री लमाणतांड्याचा चांदण्या माळावर मुक्काम असताना बिरदेवाने आपले निजस्वरूप प्रकट केले. गोसाव्याचे रूप धारण करून ते भक्ताच्या शोधासाठी साकूर नगरीत आले. मुळा नदी, धुपेश्वर नाला आणि डोंगरदऱ्यांनी वेढलेली साकूर नगरी त्यांना अत्यंत रमणीय वाटली. चांदण्या माळाजवळील धनगरवाड्यात गोसावीरूपातील वीरभद्र देव गेले. तेथे भरपूर दूध-दुभते पाहून त्यांनी धनगराकडे भोजनाची इच्छा व्यक्त केली. धनगराने भोळ्या भक्तीने गोसावीरूपातील वीरभद्राची पूजा केली आणि त्यांना दूध-भाकरीचे भोजन दिले. प्रसन्न होऊन देवाने त्याला आशीर्वाद दिला आणि शेळी-मेंढ्यांची सेवा हीच लक्ष्मीची सेवा असल्याचे सांगितले. यानंतर विठोबाने जवळच्या लोकांना सांगितले की, रात्री आलेले गोसावी म्हणजे वीरभद्र देव आहेत. सत्ययुगात दिलेले वचन पूर्ण करण्यासाठी त्यांनी साकूरमध्ये अवतार घेतला आहे. शेळ्या-मेंढ्यांची अविरत सेवा करा, तीच तुमची पाठराखण करील, असा संदेश त्यांनी दिला.

विठोबा वारंवार चांदण्या माळावर वीरभद्र प्रकट झाल्याचे सांगू लागला. 'बारा बैलांचा गाडा जुंपा आणि झांजरी-डफाच्या तालात देवाला गावात मिरवा. गाडीचे चाक ज्या ठिकाणी रुतते, तेथून पाच साखळ्यांवर देवाची स्थापना करा,' असा त्याचा आग्रह होता. सुरुवातीला कुटुंबीयांना त्याचे बोलणे विचित्र वाटले; मात्र अखेर त्याच्या म्हणण्यानुसार सत्यता पडताळण्याचे ठरले. सर्वजण चांदण्या माळावर गेले. लमाणबाबाकडून कपिला गायीची माहिती घेतली. लमाणबाबाने सांगितले की, ही गाय घोडगिरीपासून त्यांच्या तांड्यात आहे. सुमारे बारा वर्षांपासून ती एका पायाने लंगडत असून अनेक उपचार करूनही त्याचा उपयोग झाला नाही. मात्र ही गाय अत्यंत गुणवान असून तिच्या आगमनापासून तांड्यात कोणतीही कमतरता भासली नाही. त्यामुळे तिला कामधेनू मानले जात होते.

हे ऐकून बाल विठोबाने गायीसमोर बसून तिला दंडवत घातला. तिच्या खुरांना हात लावताच तेथून एक चमचमता गारगोटीचा खडा बाहेर पडला आणि विठोबासमोर येऊन पडला. त्यानंतर कपिला गाय मुक्त झाली. भवानीमातेने आपला अवतार संपविला. आजही साकूरच्या वनात मुक्ताईदेवीच्या रूपाने माता पार्वती वास्तव्यास असल्याची श्रद्धा आहे. तिची यात्रा चैत्र कृष्ण पक्षातील तृतीया-चतुर्थीला भरते. ज्या चांदण्या माळावर बिरदेव प्रथम प्रकट झाले, तेथे बारा बैलांचा गाडा नेण्यात आला. साकूरमधील नगरजन, मेंढपाळ आणि धनगर मोठ्या उत्साहाने तेथे जमले. बाल विठ्ठलाने बिरदेवाचे 'चांगभले' म्हणत भंडाऱ्याची उधळण केली. झांजरी व डफाच्या गजरात बिरोबा अर्थात वीरभद्र देवाची साकूर येथे प्राणप्रतिष्ठापूर्वक स्थापना करण्यात आली.

- संकलन -
**इंद्रजित खेमनर**
**संचालक - स.म.भा.सं.थोरात सह. साखर कारखाना, अमृतनगर, संगमनेर**

**विठोबा भगत आणि बिरोबाची भक्ती**

बालक विठोबा पुढे वीरभद्र देवाची नियमित भक्तीपूजा करू लागला. वयात आल्यानंतर तो 'विठोबा भगत (खिल्लारी)' म्हणून ओळखला जाऊ लागला. तो ब्राह्ममुहूर्तावर उठून देवाने सांगितलेल्या पद्धतीने पूजा व कवने करू लागला. त्याच्या हातून भस्म व भंडाऱ्याच्या माध्यमातून सर्पदंश, विंचूदंश, भूतबाधा, करणी-कपट आदींपासून लोकांना दिलासा मिळत असल्याची श्रद्धा होती. अशा प्रकारे साकूरमध्ये विठोबा आणि बिरोबा या भक्त-देवाची जोडी प्रसिद्ध झाली. दोघे एकांतात भक्ती व जनकल्याणाविषयी चर्चा करीत आणि सोंगट्या खेळत असत. एकदा बिरदेवाने विठोबाला सांगितले की, सोंगट्या खेळताना स्त्रीच्या बांगडीचा आवाज होऊ नये. ज्या दिवशी त्या आवाजाने त्यांचा एकांत भंग होईल, त्या दिवसापासून आपण या मूर्तीतून तुझ्यासमोर प्रकट होणार नाही.

कालांतराने विठोबा भगताची पत्नी लक्ष्मीबाई यांच्या मनात पतीविषयी शंका निर्माण झाली. एके रात्री विठोबा मंदिरात गेल्यानंतर त्या त्यांच्या मागे गेल्या. मंदिरात बिरदेव विठोबासमोर साक्षात प्रकट झालेले त्यांनी पाहिले. दोघांचा सोंगट्यांचा डाव रंगात आला असताना बिरदेवाचे लक्ष लक्ष्मीबाईंकडे गेले. त्यांनी विठोबाला सांगितले की, पूर्वी सांगितल्याप्रमाणे आज बांगडीचा आवाज झाला आहे; त्यामुळे आता माझे निजस्वरूप तुला दिसणार नाही. देवाचे बोलणे ऐकून लक्ष्मीबाई घाबरून मागे धावू लागल्या आणि त्यांच्या बांगड्यांचा आवाज झाला. त्या क्षणी लक्ष्मीबाई शिळारूप झाल्याची श्रद्धा आहे. मंदिराबाहेरील त्यांची शिळा आजही या घटनेची साक्ष देत असल्याचे मानले जाते.

**भक्तीचे वरदान आणि परंपरा**

एकदा विठोजी भगतांनी बिरदेवाला डोळेभरून दर्शन देण्याची विनंती केली. त्यांच्या भक्तीने प्रसन्न होऊन बिरदेवाने विराट रूप धारण केले आणि ब्रह्मा, विष्णू व महेश या त्रिरूपांत दर्शन दिले. 'तुला काय हवे ते माग,' असे सांगितल्यावर विठोजी भगतांनी धन-द्रव्य न मागता देवाच्या चरणाजवळ जागा आणि पिढ्यान्पिढ्या आपल्या कुळात देवाची भक्ती राहावी, अशी इच्छा व्यक्त केली. देवाने त्यांची इच्छा पूर्ण करण्याचे वचन दिले. तेव्हापासून विठोजी-बिरोजी छत्रीमंदिराची परंपरा सुरू असल्याचे सांगितले जाते. साकूरमध्ये अनेक सिद्ध आत्मे, राजयोगी आणि भक्त होऊन गेले. विठोजी भगतांनंतर बाळकृष्ण ब्रह्मचारी, सखाराम गंगा, दादा शिवराम, गणपती भगत अशा अनेक भक्तांनी भक्तीची परंपरा पुढे चालविली. आजही वीरभद्र देवाच्या पूजेचा मान खिल्लारी कुटुंबाकडे आहे. देवस्थानाचे अध्यक्ष व पुजारी राजयोगी वीरभद्रराज भगत देवाची सेवा, पूजा आणि देवस्थानाची देखभाल करीत आहेत. त्यांच्या समवेत सरपंच श्री. शंकरराव खेमनर व श्री. अशोकराव खेमनर कार्यरत आहेत.

**साकूरचा बिरोबा : श्रद्धेचे जागृत स्थान**

श्री बिरदेव हे बिरोबा, बिरुबा, बिरप्पा, वीरभद्र, विरुपाक्ष, विरुप्पा आणि वीरण्या अशा विविध नावांनी प्रसिद्ध आहेत. विविध प्रदेशांत भ्रमण करून भक्तीचा संदेश देत ते साकूर क्षेत्री स्थानापन्न झाले आणि 'साकूरचा बिरोबा' म्हणून प्रसिद्ध पावले, अशी आख्यायिका आहे. गारगोटीच्या खड्यापासून प्रकट झालेली आणि शेंदूरचर्चित असलेली ही मूर्ती स्वयंचलितपणे वाढत असल्याची भक्तांची श्रद्धा आहे. आज या मूर्तीला पंधरा फुटांचा फुलांचा हारही अपुरा पडतो, असे सांगितले जाते. बिरोबाच्या भव्य मूर्तीमुळे साकूर नगरीला विशेष धार्मिक व सांस्कृतिक महत्त्व प्राप्त झाले आहे. श्री क्षेत्र साकूरचा बिरोबा हा शिव अधिष्ठान असलेला जागृत देव मानला जातो. भक्तांचे रक्षण, भयमुक्ती, ज्ञान-बोध आणि शांती देणारा परमात्मा म्हणून त्याची श्रद्धेने पूजा केली जाते. मंदिराचा पाचवा जीर्णोद्धार होत असल्याची माहिती वीरभद्रराज भगत यांनी दिली आहे.

**नवस, भक्ती आणि श्रद्धा**

बिरोबा भावना, भक्ती आणि श्रद्धेचा भुकेला असल्याची भक्तांची भावना आहे. विविध भागांतून भाविक येथे येऊन नवस फेडतात. धनगर समाजातील भाविक भंडारा, खोबरे, शेंदूर आणि अन्नदानाचा नवस करतात. काही भाविक चांदीचा पाळणा, घंटा किंवा नाण्यांचा अभिषेक अर्पण करतात. मनोकामना पूर्ण झाल्यानंतर गूळ किंवा शेरणी वाटण्याचीही परंपरा आहे. श्री क्षेत्र साकूर आणि पंचक्रोशीतील भक्त पेढे, नारळ, शेंदूर, फुले-फळे देवाला अर्पण करतात. दुधा-पाण्याचा अभिषेक, सत्यनारायण पूजा, पौर्णिमेला भंडारा-महाप्रसाद तसेच होम-हवनाचे कार्यक्रम होतात. भाविक श्रद्धा आणि दृढविश्वासाने बिरोबाला शरण जातात.

कर्म, भक्ती आणि जनसेवेचा संदेश

बिरोबा कर्मश्रेष्ठत्वाचा मार्ग सांगतात. उपजीविकेसाठी कर्म, उद्योग आणि व्यवसायाची कास धरावी, सत्कर्म करावे, असा संदेश या भक्तीपरंपरेतून दिला जातो. शेती, मेषपालन आणि गोपालन या व्यवसायांना विशेष महत्त्व देण्यात आले आहे. प्राप्त परिस्थितीत आनंदाने राहणे, आई-वडिलांची सेवा करणे, गृहस्थाश्रमातील कर्तव्ये पार पाडणे, जनसेवा करणे आणि सर्व प्राणीमात्रांवर प्रेम करणे, हा बिरोबाच्या भक्तीपरंपरेतील मुख्य संदेश आहे. मानवी जीवनातील लोभ, माया, मत्सर, द्वेष, मोह आणि अहंकार या षड्विकारांवर विजय मिळवून विवेक, नम्रता आणि सहनशीलता अंगीकारावी, असा उपदेश केला जातो. भक्ती म्हणजे केवळ पूजा नव्हे, तर सदाचार, सेवा, परिश्रम आणि जनकल्याणाचा मार्ग आहे, हीच या परंपरेची शिकवण आहे.

धन्य ती भूमी, जिथे तुझे वास्तव्य;
धन्य ती लेकरे, जे तुझे भक्त;
धन्य ते साकूर, ज्या स्थानी तुझा वास;
धन्य ते दु:खी, जे तुझ्या सेवेत लीन झाले.

अशा श्रद्धा, भक्ती आणि लोकपरंपरेने समृद्ध असलेले श्री क्षेत्र साकूरचे विठ्ठल-बिरदेव, अर्थात बिरोबा महाराज, आजही असंख्य भाविकांच्या श्रद्धेचे केंद्रस्थान आहेत. पिढ्यान्पिढ्या चालत आलेली ही भक्तीपरंपरा साकूरच्या धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक जीवनाचा अविभाज्य भाग बनली आहे.



श्री क्षेत्र बिरोबा महाराज यात्रा उत्सव, साकूर
येथे सर्व भाविक भक्तांचे हार्दिक स्वागत..!
- स्वागतोत्सुक -
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सेवाभावी संस्था
साकूर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर





उपाध्यक्ष
श्री. शंकरराव खेमनर
सभापती, संगमनेर कृषी उत्पन्न बाजार समिती, संगमनेर

अध्यक्ष
श्री. इंद्रजित खेमनर
संचालक, सह.भा.सं.थोरात सह. सा.कारखाना, संगमनेर

सर्व संचालक मंडळ, पदाधिकारी, शिक्षक व ग्रामस्थ

श्री क्षेत्र बिरोबा महाराज यात्रा उत्सव, साकूर निमित्त सर्व भाविक भक्तांचे हार्दिक स्वागत




ग्रामपंचायत कार्यालय, साकूर
ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर
सचिन दिनकर सोनवणे - सरपंच
शंकरराव हनुमंता खेमनर - उपसरपंच
नागेश पाबळे - ग्रामविकास अधिकारी
सन्माननीय सदस्य मंडळ -
सुनिल निवृत्ती भुजबळ, शोभा महेंद्र केदार, तुकाराम साहेबराव पवार, लिलाबाई दत्तू चितळकर, चांगदेव भागाजी खेमनर, सुवर्णा एकनाथ केदार, हजराबी लतीफ पटेल, वसीम दादा पटेल, उर्मिला सचिन कातोरे, शोभा बाळू डोखे, राजेंद्र भिवाजी सोनवणे, रमेश मधुकर पेंडभाजे, सविता दिपक फिरोदिया, स्वाती शांताराम गाडेकर, शैला कैलास टेकुडे, निसार अब्दुल पटेल

श्री क्षेत्र बिरोबा महाराज यात्रा उत्सव, साकूर निमित्त सर्व भाविक भक्तांचे हार्दिक स्वागत
मुळा खोरे ग्रामिण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्यादित, साकूर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर
विठ्ठल बाळकृष्ण मैड - चेअरमन | गोकुळ कोंडिभाऊ पेंडभाजे - व्हा. चेअरमन | संतोष पंधारे - सचिव
सन्माननीय संचालक मंडळ -
विजय फिरोदिया, मुसा शेख, अशोक कर्डिले, जिजाराम देवगिरे, हौसाबाई गाडेकर, सुरेश सोनवणे, कल्पना वखारे, अशोक शेलार, अनमोल खेमनर